**विकास वॉटरप्रुफिंग**
घर व बंगला गळतीपासून
राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे
नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने
लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २४७ वा | सोमवार, दि. ११ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



**सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!**
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

**आरोग्यविषयक**
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी
ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड
अल्टिमेट जिमच्या समोर
सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार — SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार — SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL — HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG — RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


# प्रशासक राजवटीत ग्रामविकास ठप्प; ७५० ग्रामपंचायतींचा विकास ठप्प

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी तब्बल ९०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असतानाही, तो खर्च करण्याचा अधिकार नसल्याने गावागावातील विकासकामे अक्षरशः खोळंबल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील ७५० हून अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर नियुक्त करण्यात आलेल्या प्रशासकांना आर्थिक अधिकार नसल्याने निधी तिजोरीत पडून आहे आणि विकासाच्या प्रतीक्षेत असलेल्या गावांना मोठा फटका बसत आहे.

गेल्या वर्षी जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर झालेला ३५० कोटी रुपयांचा निधी, चालू आर्थिक वर्षात प्रस्तावित ४०० कोटी रुपयांची तरतूद, तसेच १५ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त १६० कोटी रुपये, असा एकूण जवळपास ९०० कोटी रुपयांचा निधी जिल्ह्याच्या ग्रामीण विकासासाठी उपलब्ध आहे. या निधीतून रस्ते, पाणीपुरवठा, गटारी, सार्वजनिक सुविधा, ग्रामविकासाच्या मूलभूत योजना आणि विविध बांधकामे हाती घेण्याचे नियोजन आहे. मात्र, निधी असूनही अधिकाराअभावी कामांना सुरुवात करता येत नसल्याने ग्रामविकासाची चाके थांबली आहेत.

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली असली, तरी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या प्रशासकांना आर्थिक निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आलेला नाही. परिणामी कोणतेही विकासकाम मंजूर करणे, त्यासाठी निधी वितरित करणे किंवा पूर्ण झालेल्या कामांची बिले काढणे शक्य होत नाही. यामुळे अनेक गावांमध्ये मंजूर कामे रखडली असून काही ठिकाणी सुरू असलेली कामेही ठप्प पडली आहेत.




या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती आणि सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा करून यावर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली आहे. सोमवारी (ता. ११ मे) पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासोबत या प्रश्नावर महत्त्वपूर्ण बैठक होणार असून, त्यामध्ये अंतिम निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रशासकांना मर्यादित आर्थिक अधिकार देणे किंवा गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांच्यामार्फत बिले मंजूर करण्याचा पर्याय या बैठकीत चर्चिला जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, पावसाळा तोंडावर आल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. मे महिना सुरू झाला असून जूनपासून पावसाळ्याची चाहूल लागेल. ग्रामीण भागात पावसाळ्यात अनेक विकासकामे करणे शक्य नसते. जर पुढील आठवडाभरात निर्णय झाला, तर किमान ५० टक्के कामे पूर्ण होऊ शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र निर्णय लांबला, तर विकासकामांना आणखी मोठा ब्रेक लागणार आहे.

दुसरीकडे, आर्थिक अधिकारांबाबतचा निर्णय न झाल्यास ग्रामपंचायत निवडणुका, त्यानंतर नवीन सदस्यांची निवड आणि प्रशासन स्थिर होण्यास किमान सहा महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. यामुळे गावागावातील रस्ते, पाणी योजना, स्वच्छता सुविधा, इमारतींची कामे आणि इतर विकास आराखडे आणखी लांबणीवर पडू शकतात.

निधी उपलब्ध, कामांची गरज प्रचंड; पण अधिकार नसल्याने विकासाला कुलूप अशी अवस्था सध्या सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागाची झाली आहे. आता पालकमंत्र्यांच्या बैठकीत कोणता निर्णय होतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# तहसीलदारांनी प्रत्येक गावात जाऊन जनतेचे प्रश्न गावातच मार्गी लावावेत- बावनकुळे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात पूर्वीपासून गृह खाते हे जनतेच्या जीवाचे रक्षण करते, तर महसूल खाते जनतेच्या मालमत्तेचे रक्षण करत असते, या सरकारच्या धोरणानुसार तहसीलदारांनी तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन जनतेचे प्रश्न गावातच मार्गी लावावेत अशी प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

करमाळा येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आज करण्यात आले. व घरकुलाच्या बांधकामासाठी वाळूचे प्रतिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते यावेळीआमदार नारायण आबा पाटील, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, जि. प. सदस्य गणेश चिवटे, रश्मीताई बागल, जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांत अधिकारी जयश्री आव्हाड, तहसीलदार शिल्पा ठोकडे, सह दुय्यम निबंधक एस. एस. कोकाटे आदी मान्यवर व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



यावेळी महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, जनतेने गाऱ्हाणी घेऊन मंत्रालयात जाण्याऐवजी मंत्र्यांनी गावात जाऊन जनतेचे निवेदन तक्रारी स्वीकारणे व सोडवणे हे या सरकारचे धोरण आहे. पुढील चार महिन्यात जिल्ह्यातील एकही गाव यातून सुटणार नाही याची खबरदारी जिल्हाधिकारी यांनी घ्यावी..यापुढे मोजणी प्रक्रियेत गतिमानता येण्यासाठी पंधरा दिवसात मोजणी पूर्ण करणे जिल्ह्यातील पानंद रस्ते व वहीवटीचे रस्ते जिल्हाधिकारी, तहसीलदार, तलाठी यांनी पालकमंत्र्यांशी समन्वय साधून प्रत्येक रस्ते शोधून त्यांची मोजणी करून शेतकऱ्यांच्या वहिवाटीसाठी सुरू करावेत. तसेच रस्त्याच्या कडेने झाडे लावावी जेणेकरून झाडे तोडली जाणार नाहीत व रस्ता बंद होणार नाही, जर कोणी रस्ता अडवला तर त्या व्यक्ती वर कारवाई करण्यात येईल, त्यासाठी जिल्ह्यातील संपूर्ण मोजणी होणे आवश्यक आहे.

जर शेतकऱ्यांसाठी 24 तास लाईट आणि सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून दिले तर शेतकऱ्यां च्या मुलांना नोकरी मागण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे शेतकरी सदन व समृद्ध होईल. पुढील पाच वर्षात सर्व शेतकऱ्यांचे वहिवाटी चे रस्ते बारमाही सुरू होतील, यासाठी हे सरकार प्रयत्नशील आहे. तसेच राज्य शासनाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला असून अनधिकृत रहिवासी घरे कायमस्वरूपी त्यांच्या नावे करून रजिस्ट्रीचा खर्च शासन करेल. तसेच हे सरकार जनतेच्या हितासाठी असून जनतेचे प्रश्न सोडवणे हे सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांचे कर्तव्य आहे. शिवरायांच्या राज्यकारभारात गतिमानता, पारदर्शीपणा आणि लोकाभिमुखता असे शासन होते, समाजातील शेवटच्या घटकातील व्यक्तीचे कल्याण व्हावे असे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आहेत त्यानुसार हे सरकार काम करत आहे. नागरिकांनी दिलेल्या, नियमात असलेल्या निवेदना वर तीन दिवसात मार्ग काढण्यात येईल असे आश्वासन बावनकुळे यांनी यावेळी नागरिकांना दिले. तसेच देवस्थानाच्या जमिनी बाबत कायद्यात सुधारणा करण्याबाबत त्यांनी सांगितले.

त्याचबरोबर जनतेची जराही हेळसांड करू नये, जनतेचे प्रश्न तात्काळ सोडवावेत तसेच भ्रष्टाचाराच्या कुठल्याही तक्रारी येता कामा नयेत अशा सूचनाही महसूल मंत्री बावनकुळे यांनी केल्या.

# ‘थलपती’ विजय यांची पहिल्याच दिवशी धडाकेबाज सुरुवात

## महाराष्ट्राचे मुख्यमंत्री घेतील का आदर्श

### २०० युनिट मोफत वीज, ड्रग्जविरोधी आणि महिला सुरक्षेसाठी स्वतंत्र टास्क फोर्सची घोषणा

**दिल्ली (वृत्त सेवा):-** सी. जोसेफ विजय यांनी तमिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच प्रशासनात वेग आणि निर्णयक्षमतेचा नवा संदेश दिला आहे. निवडणुकीच्या निकालानंतर अवघ्या काही दिवसांत पार पडलेल्या शपथविधीनंतर मुख्यमंत्री विजय यांनी पहिल्याच दिवशी तीन मोठ्या निर्णयांवर स्वाक्षरी करत संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले आहे.

राजकारणात ‘थलपती’ म्हणून लोकप्रिय असलेल्या विजय यांनी जनतेला दिलेली आश्वासने केवळ भाषणापुरती न ठेवता प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे पाऊल टाकले आहे. त्यामुळे तमिळनाडूत त्यांच्या नेतृत्वाखाली नव्या राजकीय शैलीची सुरुवात झाल्याची चर्चा रंगली आहे.

मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारताच विजय यांनी राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारा निर्णय घेत २०० युनिटपर्यंत मोफत वीज देण्याचा प्रस्ताव मंजूर केला. वाढती महागाई, घरगुती खर्च आणि वीजबिलांचा बोजा लक्षात घेता हा निर्णय सामान्य कुटुंबांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे.

तमिळनाडूत यापूर्वी विविध सरकारांनी अनुदानाच्या घोषणा केल्या असल्या तरी पहिल्याच दिवशी इतक्या मोठ्या प्रमाणावर जनहिताचा निर्णय घेणारा मुख्यमंत्री म्हणून विजय यांची चर्चा होत आहे. विरोधकांकडून या निर्णयाच्या आर्थिक परिणामांवर प्रश्न उपस्थित होत असले तरी जनतेत मात्र या घोषणेचे स्वागत होत आहे.

राज्यात वाढत चाललेल्या अमली पदार्थांच्या समस्येवर कठोर पावले उचलण्याचा निर्धार करत विजय यांनी



विशेष कृती दल अर्थात ‘स्पेशल टास्क फोर्स’ स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

**ड्रग्ज माफियांवर कडक कारवाईची तयारी**

तरुण पिढीला ड्रग्जच्या विळख्यातून बाहेर काढणे, आंतरराज्य तस्करी रोखणे आणि माफिया साखळी उद्ध्वस्त करणे हे या पथकाचे मुख्य उद्दिष्ट असणार आहे. ‘ड्रग-फ्री तमिळनाडू’ ही केवळ घोषणा नसून राज्य सरकारचे प्रमुख ध्येय असेल, असा संदेश मुख्यमंत्री विजय यांनी दिला आहे.

गेल्या काही वर्षांत दक्षिण भारतातील काही भागांत अमली पदार्थांच्या वाढत्या जाळ्यामुळे चिंता व्यक्त केली जात होती. त्याच पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**महिला सुरक्षेलाही सर्वोच्च प्राधान्य**

महिलांवरील अत्याचार, छेडछाड आणि वाढत्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विजय सरकारने महिला सुरक्षेसाठी स्वतंत्र विशेष दल तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे.

महिलांना निर्भय वातावरण मिळावे, रात्रीच्या वेळीदेखील सुरक्षितपणे वावरता यावे आणि गुन्हेगारांवर तातडीने कारवाई व्हावी, यासाठी हे विशेष पथक काम करणार आहे. महिला सुरक्षेला सरकारच्या पहिल्या दिवसापासूनच सर्वोच्च प्राधान्य दिल्याचा संदेश या निर्णयातून देण्यात आला आहे.

**‘पहिल्या दिवसापासून काम सुरू करेन’ — विजय**

निवडणूक प्रचारादरम्यान विजय यांनी ‘मुख्यमंत्री झालो तर पहिल्या दिवसापासून कामाला सुरुवात करेन,’ असे आश्वासन दिले होते. शपथविधीनंतर काही तासांतच घेतलेल्या निर्णयांमुळे त्यांनी आपल्या शब्दांना कृतीची जोड दिली आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, लोकाभिमुख घोषणा आणि कठोर प्रशासन या दोन्हींचा समतोल साधण्याचा प्रयत्न विजय करत आहेत. मोफत वीज, ड्रग्जविरोधी मोहीम आणि महिला सुरक्षा या तीन मुद्द्यांवर भर देत त्यांनी आपल्या सरकारची दिशा स्पष्ट केली आहे.

विजय यांच्या या जलद निर्णयक्षमतेमुळे सोशल मीडियावर त्यांचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे. ‘कोणत्याच मुख्यमंत्र्यांना जमलं नाही, ते विजय यांनी करून दाखवलं,’ अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.

चित्रपटसृष्टीतून राजकारणात आलेल्या विजय यांनी पहिल्याच दिवशी घेतलेल्या निर्णयांमुळे तमिळनाडूच्या राजकारणात मोठा बदल घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता त्यांच्या घोषणा प्रत्यक्षात कितपत यशस्वी होतात आणि प्रशासन किती प्रभावीपणे काम करते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# दीर्घ पावसामुळे यंदा तलावात टिकले पाणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सध्या उन्हाळ्याच्या तीव्र झळा जाणवत आहेत. उच्चांकी तापमान नोंदले जात आहे. अशावेळी सरत्या पावसाळ्यात उशिरापर्यंत झालेल्या पावसामुळे तलावांमध्ये पाणी टिकले गेले. यामुळे पाणीसाठा स्थिर राहिला आणि बाष्पीभवन कमी होण्यास मदत झाली आहे.

शेतकऱ्यांमधून यामुळे समाधान व्यक्त केले जात आहे.

आज सोलापूर जिल्हातील ७ मध्यम तलावांत ४.२५ टीएमसी, तर ३३ लघु तलावांत २९ दलघमी पाणीसाठा शिल्लक आहे. सर्वाधिक १.३८ टीएमसी पाणी तळेहिप्परगा तलावात असल्याचे पाटबंधारे कार्यालयाकडून सांगण्यात आले. यंदा जिल्ह्यात जानेवारीपासून उन्हाळ्याचे चटके बसत असले, तरी अधून-मधून ढगाळ वातावरण व काही ठिकाणी लहान-मोठ्या पावसाच्या सरी पडत आहेत.

याचा परिणाम तलावातील पाणीसाठा वाढण्यासाठी होत नसला,



तरी पाण्याचे बाष्पीभवन कमी होत आहे. त्यामुळे तलावातील पाणी टिकून राहिले आहे. मे महिन्याच्या अखेरला यातील बरेच तलाव तळपातळी गाठणार असले, तरी लगतच्या विहिरी व बोअरला पाणी टिकून राहणार आहे.

जिल्ह्यातील सर्वच सातही मध्यम तलावांत पाणीसाठा उपलब्ध असून, यापैकी तळेहिप्परगा (एकरुख) तलावात १.३८ टीएमसी पाणी शिल्लक आहे. इतरही मध्यम तलावांत पाणी उपलब्ध शिल्लक असल्याचे पाटबंधारे विभागाकडील आकडेवारीवरून दिसत आहे. जिल्ह्यातील ५६ लघु तलावांपैकी ३३ तलावांत कमी-अधिक प्रमाणात पाणी असल्याचे सांगण्यात आले.

**लघु तलावांतील स्थिती**

जिल्हात ५६ लघु तलावांपैकी निमगाव (माढा) तलाव मे महिन्यात पूर्ण क्षमतेने भरला आहे. होटगी (दक्षिण सोलापूर) ५५ टक्के, तर बीबीदारफळ (उत्तर सोलापूर) तलावात साधारण ४६ टक्क्यांपर्यंत पाणीसाठा उपलब्ध आहे.

तळसंगी नवा, घेरडी प्रत्येकी ३८ टक्के, रामपूर (दक्षिण सोलापूर) ३४ टक्के, पाथरी (बार्शी) ३० टक्के, वैराग व धुबधुबी प्रत्येकी २८ टक्के, पोरांवर व सोरेगाव प्रत्येकी २६ टक्के, हणमगाव, कोरेगाव, तळसंगी जुना प्रत्येकी २२ टक्के, तर इतर तलावात २० टक्क्यांच्या आत पाणीसाठा आहे.

**मागील वर्षापेक्षा यंदा अधिक पाणी**

मागील पेक्षा या वर्षी तलावातील पाणी पातळी अधिक असल्याचे दिसत आहे. मागील वर्षी सात मध्यम तलावात ८६ दलघमी म्हणजे ३.०४ टी एमसी, २९ टक्के तर ५६ पैकी १५ लघू तलावात ११ दलघमी साडेसहा टक्के इतका पाणी साठा होता.

एकरुख मध्यम तलावात सर्वाधिक १.१५ टी एमसी ५२ टक्के, बीबीदारफळ, होटगी लघु तलावात सर्वाधिक प्रत्येकी ३९ टक्के, पाथरी व कोरेगाव प्रत्येकी २७ टक्के इतकी पाणी साठा होता.

# गॅसटंचाईवर पर्याय म्हणून सोलापुरात रेशनवर रॉकेल वाटपास सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आखाती देशांतील युद्धस्थितीमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य गॅस टंचाईवर उपाययोजना म्हणून शासनाने पुन्हा एकदा रेशन दुकानांतून केरोसीन (रॉकेल) वाटपाचा निर्णय घेतला आहे.

सर्वोच्च न्यायालयातील एका याचिकेमुळे २०१६ पासून बंद झालेला हा पुरवठा तब्बल १० वर्षानंतर पुन्हा सुरू झाला असून, सोलापूर जिल्ह्यात सांगोला तालुक्यापासून याचे वाटप सुरू करण्यात आले आह

सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण १ लाख ४४ हजार लिटर केरोसीन मंजूर झाले आहे. त्यापैकी १२ हजार लिटरचा पहिला टँकर जिल्ह्यात दाखल झाला असून, प्रशासनाने त्याचे वितरण सुरू




केले आहे. ग्रामीण भागासाठी १ लाख ३२ हजार लिटर, तर सोलापूर शहरासाठी १२ हजार लिटरचा कोटा निश्चित करण्यात आला आहे.

गेल्या दहा वर्षांत केरोसीनच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. २०१६ च्या तुलनेत आता हे दर २२ ते २३ रुपयांनी वाढले असून, शिधापत्रिकाधारकांना प्रतिलिटर ६२ ते ६३ रुपये दराने रॉकेल मिळणार आहे. वाहतूक खर्चामुळे वेगवेगळ्या तालुक्यांत दरात थोडाफार फरक असू शकतो.

गेल्या दशकात एलपीजी गॅस सहज उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण व शहरी भागातून "स्टोव्ह" जवळपास हद्दपार झाले आहेत. आता रॉकेल मिळणार असले तरी, ते वापरण्यासाठी अनेकांना पुन्हा नवा स्टोव्ह आणि तो स्वच्छ करण्यासाठी लागणारी "पिन" खरेदी करावी लागणार आहे.

# अवैध संपत्ती लपवणाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाचा दणका; आता बेनामी संपत्ती जप्त होणार

**दिल्ली (वृत्त सेवा):-** सर्वोच्च न्यायालयाने काळ्या पैशाविरोधातील लढ्यात अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय देत बेनामी संपत्ती लपवणाऱ्यांना मोठा धक्का दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, नोव्हेंबर २०१६ पूर्वी झालेले बेनामी व्यवहार असले तरी केंद्र सरकार आणि आयकर विभागाला संबंधित मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार राहणार आहे.

या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून ड्रायव्हर, घरगुती नोकर, स्वयंपाकी, दूरचे नातेवाईक किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींच्या नावावर संपत्ती खरेदी करून काळा पैसा लपवणाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार निर्माण झाली आहे. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे बेनामी व्यवहारांच्या माध्यमातून करचुकवेगिरी करणाऱ्या आणि अवैध संपत्ती गोळा करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

या निकालामुळे तपास यंत्रणांना मोठे बळ मिळाले असून आयकर विभाग आणि संबंधित यंत्रणांना आता दोन ते तीन दशकांपूर्वीच्या संशयास्पद व्यवहारांच्या फाईल्स पुन्हा उघडण्याचा कायदेशीर मार्ग उपलब्ध झाला आहे.

गेल्या अनेक वर्षांत विविध प्रकरणांमध्ये राजकीय, व्यावसायिक आणि आर्थिक प्रभावाचा वापर करून इतरांच्या नावावर संपत्ती उभी करण्यात आल्याचे आरोप होत होते. आता सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट आदेशामुळे अशा व्यवहारांची चौकशी अधिक वेगाने होण्याची शक्यता आहे.

न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले की, २०१६ मध्ये सुधारित करण्यात आलेल्या बेनामी व्यवहार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत नोव्हेंबर २०१६ पूर्वीच्या प्रकरणांमध्ये सात वर्षांच्या कठोर कारावासाची शिक्षा लागू होणार नाही. मात्र अशा मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार सरकारकडे राहील.

**वात्रटिका**

**तीच दमदार शाई**

कोणी फेकली कोणावर
काळे करण्यासाठी शाई...
फेकण्यापेक्षा लिहून करावा
निषेध,पण इथेच होते घाई...
बोलणार्‍याचे तोंड फेकीने
कधी बंद होत नसते...
अटकाव करते लिहून शाई
तीच खरी दमदार असते...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# करमाळ्यात सराफ व्यावसायिकांचे निवेदन
# पोलिसांवर खंडणी, मारहाणीचे गंभीर आरोप



**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** अहिल्यानगर येथील कोतवाली पोलीस ठाणेतील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सराफ व्यावसायिकांचे अपहरण, अमानुष मारहाण, बेकायदेशीर रिकव्हरी आणि खंडणी उकळल्याचा गंभीर आरोप करत समस्त सराफ सुवर्णकार व संलग्न कारागीर व्यावसायिक बांधवांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. संबंधित दोषी अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, तसेच त्यांच्या मालमत्तेची चौकशी करून ती जप्त करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक २३८/२०२६ च्या तपासाच्या नावाखाली पोलीसांनी कायद्याचे उल्लंघन करत सराफ व्यावसायिकांना कोणतीही पूर्वसूचना अथवा कायदेशीर नोटीस न देता ताब्यात घेतल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यामध्ये पीएसआय गणेश देशमुख आणि त्यांच्या डीबी पथकाचा उल्लेख करण्यात आला असून, हे कृत्य भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ अंतर्गत मिळालेल्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच सर्वोच्च न्यायालयाने ह्यडी. के. बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्यह्ल या खटल्यामध्ये अटक आणि चौकशी संदर्भात दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचेही उल्लंघन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. संशयित अथवा आरोपींना मिळणाऱ्या मूलभूत अधिकारांकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे.

सराफ व्यावसायिकांकडून चोरीच्या गुन्ह्याचा तपास करताना महाराष्ट्र शासनाने १४ मार्च २०२४ रोजी जारी केलेल्या विशेष मार्गदर्शक सूचनांचे पालन न करता, संबंधित व्यावसायिकांना अमानुष मारहाण करण्यात आली. तसेच दुकानातील कायदेशीर सोने–दागिने जबरदस्तीने आणण्यास भाग पाडून त्याची आटणी करून लगड तयार करण्यास भाग पाडल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार म्हणजे 'पोलीस संरक्षणात टाकलेला दरोडा' असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

याशिवाय, मदतीला गेलेल्या समाजबांधवांनाही पोलिसांकडून मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. उमेश बुऱ्हाडे व इतरांना सीसीटीव्ही नसलेल्या खोलीत नेऊन त्यांचे मोबाईल फोन काढून घेण्यात आले, तसेच त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेतील कलम ३५३ आणि ३५४ अंतर्गत खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देऊन जबरदस्तीने जबाबांवर स्वाक्षऱ्या घेतल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणात दोषी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केवळ निलंबित न करता कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, त्यांच्यावर अपहरण, खंडणी, गंभीर दुखापत, पुराव्यांशी छेडछाड आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी तातडीने गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या स्थावर आणि जंगम मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (ACB) चौकशी करून बेकायदेशीर संपत्ती जप्त करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. सराफ व्यावसायिकांकडून अमानुष छळ करून हस्तगत करण्यात आलेला सोन्याचा ऐवज तात्काळ सन्मानाने परत करण्यात यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, या प्रकरणाबाबत संबंधित जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे वारंवार लेखी आणि प्रत्यक्ष तक्रारी देऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक पोलिसांऐवजी सीआयडी किंवा विशेष तपास पथक (SIT) मार्फत निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

जर दोषींवर तातडीने कठोर कारवाई झाली नाही, तर राज्यभर सराफ सुवर्णकार आणि संलग्न कारागीर व्यावसायिकांकडून तीव्र आंदोलन,

रास्ता रोको, बेमुदत उपोषण आणि सराफ बाजारपेठ बंद आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# १५ वर्षांची तृणमूल सत्ता संपुष्टात; सुवेंदू अधिकारी होणार नवे मुख्यमंत्री

**कोलकाता (वृत्त सेवा):** पश्चिम बंगालच्या राजकारणात ऐतिहासिक घडामोड घडली असून भारतीय जनता पक्षाने २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवत तृणमूल काँग्रेसची तब्बल १५ वर्षांची सत्ता उलथवून टाकली आहे. भाजपचे वरिष्ठ नेते सुवेंदू अधिकारी यांची पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली असून गुरुवारी झालेल्या भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत त्यांच्या नावावर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्वतः पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

कोलकाता येथे झालेल्या भाजपच्या महत्त्वपूर्ण बैठकीत सुवेंदू अधिकारी यांची एकमताने विधिमंडळ पक्षनेते म्हणून निवड करण्यात आली. त्यानंतर अमित शाह यांनी 'पश्चिम बंगालमध्ये परिवर्तनाचा नवा अध्याय सुरू झाला आहे,' असे म्हणत भाजपच्या विजयाला ऐतिहासिक महत्त्व दिले.

सुवेंदू अधिकारी यांचा मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी ९ मे रोजी सकाळी ११ वाजता होणार असून या सोहळ्याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वासह विविध राज्यांतील प्रमुख नेते आणि मान्यवर उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक कामगिरी करत २९४ पैकी २०७ जागांवर विजय मिळवला. तर सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला. विशेष म्हणजे भवानीपूर मतदारसंघात सुवेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्री Mamata Banerjee यांचा पराभव केल्याने बंगालच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

२०११ पासून सलग सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसला प्रथमच इतका मोठा पराभव स्वीकारावा लागला आहे. त्यामुळे बंगालमध्ये आता नवे राजकीय समीकरण आकार घेत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

सुवेंदू अधिकारी हे पश्चिम बंगालमध्ये भाजपचे पहिले मुख्यमंत्री ठरणार आहेत. तृणमूल काँग्रेसमध्ये दीर्घकाळ प्रभावी नेता म्हणून काम केलेले सुवेंदू अधिकारी नंतर भाजपमध्ये दाखल झाले आणि अल्पावधीतच पक्षाचा प्रमुख चेहरा बनले. २०२१ मध्ये नंदीग्राममध्ये ममता बॅनर्जी यांचा पराभव केल्यानंतर त्यांची प्रतिमा अधिक मजबूत झाली होती.

भाजपच्या विजयाची घोषणा होताच कोलकात्यासह राज्यातील अनेक शहरांमध्ये कार्यकर्त्यांनी जल्लोष सुरू केला. फटाक्यांची आतषबाजी, मिठाई वाटप आणि विजय रॅलींमुळे अनेक भाग भगवेमय झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावरही 'बंगालमध्ये परिवर्तन' हा मुद्दा चर्चेचा विषय ठरला आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर**
**सातरस्ता, कारीगर पेट्रोलपंपा समोर, सोलापूर ४९३ ००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक ०४ बी-१ सन २०२६-२७ (ऑनलाईन)**

कार्यकारी अभियंता,सार्यजनिक बांधकाम विभाग क्र.2, सोलापुर–४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा. बां. विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदार यांचे कडून खालीली कामाकरिता "बी –1" नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधिकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे खांडवी ता. बाशी येथोल विठ्ठल बिरोबा मंदिर जवळ ग्रामपंचायत जागेत सभामंडप बांधणे. वर्ग ब | बी – १ | १३.९९ लक्ष | मजूर सहकारी संस्था वर्ग ब |
| २. | श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगाव टे ता माढा संचालित न्यु इंग्लिश स्कुल, पिंपळखुटे ता. माढा, जि. सोलापूर येथे वर्ग खोल्या बांधणे | बी – १ | १६.८७ लक्ष | मजूर सहकारी संस्था वर्ग ब |
| ३. | मौजे कव्हे ता बार्शी येथोल खंडोबा मंदिर समोर ग्रामपंचायत जागेत सभामंडप बांधणे. | बी – १ | १२.७२ लक्ष | मजूर सहकारी संस्था वर्ग ब |
| ४. | कर्मवीर भीमराव महाडिक चॅरिटेबल ट्रस्ट, टाकळी सिकंदर ता. मोहोळ संचालित कर्मवीर भीमराब महाडिक इंग्लिश मेडियम स्कूल, टाकळी सिकंदर ता. मोहोळ या शाळेस शौचालय बांधकाम करणे आणि रुफ टॉप सोलार (५ के. व्ही.) बसविणे. | बी – १ | ४२.३७ लक्ष | मजूर सहकारी संस्था वर्ग अ |

| | | |
|---|---|---|
| ई – निविदा उपलब्द कालावधी | : | दि. ११/०५/२०२६ (वेळ सकाळी १०.०० वा. पासुन ते १८/०४/२०२६ (सायं. १८.१५ पर्यंत ) |
| निविदा पूर्व बैठक | : | NIL |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिवस | : | दि. १८/०५/२०२६ (सायं. १८.१५ पर्यंत ) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनाक (निविदा शर्थ ८.१) | : | ई–निविदा पोर्टलवर "बीड लॉक झाल्यावर ७२ तासात "हार्ड कॉपी " १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. |
| निविदा उघडण्याचा कालावधी, ठिकाण व वेळ | : | दि. २०/०५/२०२६ मा. अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, सालापूर याचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्द आहे.
१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in
सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३)कार्यकारी अभियंता,साबंजनिक बांधकाम विभाग क्र.२.सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

सही /–
**(अ. बा. भोसले)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर**


# बचेरी महालक्ष्मी यात्रेनिमित्त जंगी कुस्त्यांचे मैदान पार पडले


**माळशिरस (कटूसत्य वृत्त):–** मौजे बचेरी येथे सालाबादप्रमाणे श्री महालक्ष्मी देवी यात्रेचे नियोजन करण्यात आले होते. यात्रेमध्ये पारंपारिक प्रथेप्रमाणे अनेक धार्मिक कार्यक्रम, कुस्ती मैदान व मनोरंजनाचे कार्यक्रम पार पडले. यात्रेनिमित्त महालक्ष्मी देवी यात्रा व कुस्ती कमिटीच्या वतीने जंगी कुस्त्याचे मैदान आयोजित करण्यात आले होते हे मैदान महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष मल्ल सम्राट मा रावसाहेब आप्पा मगर यांचे मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत पार पडले. कुस्ती मैदानामध्ये शेवटची कुस्ती बेनापुर चे पैलवान नाथा पवार व काटीचे पैलवान गौतम शिंदे यांच्यामध्ये



झाली. कुस्ती मैदानासाठी सोलापूर सांगली जिल्ह्यातील नामवंत तालमीतील वस्ताद व पैलवान मंडळी उपस्थित होते तर कुस्ती मैदानात अनेक रंगतदार कुस्त्यांनी ग्रामस्थांची मने जिंकली. कुस्ती आखाड्याचे समालोचन ख्यातनाम समलोचक पवार यांनी केले. कुस्ती आखाड्यात महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब नगर निमगाव यांनी उपस्थिती लावली. तसेच माळशिरस पंचायत समितीचे सभापती माननीय दत्ता मगर, पंचायत समितीचे सदस्य शिवराज पुकळे,मा पंचायत समिती सदस्य शहाजी महाडिक शेट,पैलवान मोहन मदने, कुस्ती आखाडा नियोजन महालक्ष्मी देवी यात्रा व कुस्ती समिती तील सदस्य पैलवान रामभाऊ गोरड, पैलवान बंडू गाढवे, प्रा सदाशिव शिंदे, नारायण शिंदे, अधिकराव माने शांतीलाल शिंदे , विकास सुळे विशेष कार्यकारी अधिकारी गणेश देशमुख तसेच यात्रा कमिटीचे सदस्य दत्तात्रय ढवळे दशरथ ढवळे सुदाम शिंदे रामभाऊ शिकारे धनाजी शिकारे बिराबाई शिंदे व ग्रामस्थांनी केले याप्रसंगी सर्व देणगीदार बंधूंचा फेटा बांधून सन्मान केला तसेच त्यांच्या हस्ते कुस्त्या लावण्यात आल्या, कुस्ती मैदानास सर्वात जास्त म्हणजेच 25001/– वर्गणी दिलेबद्दल श्री हरी इलेक्ट्रिकल वसई चे मालक बचेरी गावचे सुपुत्र श्री व सौ हरी नाना गोरड यांचे सर्वांनी कौतुक केले. त्यांचबरोबर सर्वच देणगीदार यांचे समिती व ग्रामस्थांनी तोंडभरून कौतुक केले. कुस्ती मैदानाचे नियोजन कुस्ती समितीच्या मार्गदर्शनाखाली पैलवान पैलवान रामभाऊ गोरड यांनी गेले दोन महिने परिश्रम घेऊन आखाडा यशस्वी केल्याबद्दल महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष मल्ल सम्राट रावसाहेब मगर यांनी अभिनंदन केले. कुस्ती मैदान पार पडण्यासाठी सर्व समितीने परिश्रम घेतले.

कुस्ती मैदानाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# निधन वार्ता



**अरळी (कटूसत्य वृत्त):–** अक्कलकोट तालुक्यातील अरळी (द) येथील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक काशिनाथ हणमंतप्पा गामाजी (वय –९२ ) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्यात पत्नी, तीन मुले, तीन मुली,सुना, नातवंडे असा परिवार आहे. उद्या सोमवार दि. ११ मे रोजी सकाळी ११.०० वाजता अरळी (द) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.


## CHANGE IN NAME

I am changing my name from **NIKITA VYANKATESH BOLABATTIN** To **NIKITA VYNKATESH BOLABATTIN** for passport issuance as per document.


# घटस्फोटीत पुनर्विवाह काळाची गरज चंद्रकांत पवार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेड सामाजिक संघटनेच्या वतीने शिवस्मारक सभागृह येथे विधवा विधुर घटस्फोटीत पुनर्विवाह परिचय मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.

शिवस्मारक सभागृहांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली संभाजी ब्रिगेडच्या वतीने पहिल्यांदाच सोलापूर मध्ये विधवा विदुर घटस्फोटीत पुनर्विवाह परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून 57 विधवा विदुर यांनी मेळाव्यास उपस्थित राहून नोंदणी केली

या मेळाव्यास चंद्रकांत पवार वसुंधरा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती या मेळाव्यास मार्गदर्शन करताना पवार म्हणाले की समाजातील सर्व धर्मीय विधवा विदुर घटस्फोट अश्या एकांकी जीवन जगणारे समाजात अनेक जण आहेत त्यांना जिवन जगताना मायेचा आधार मिळावा दुसरी संधी म्हणून जीवनात योग्य जोडीदार मिळावा या उद्देशाने स्तुत्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते भविष्यात अशा प्रकारचे विवाह सोहळा मोठ्या प्रमाणात संभाजी ब्रिगेडच्या वतीने आयोजित करावे असे मत व्यक्त केले.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा. पाश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विक्रम वानकर जिल्हा संघटक दिलीप भोसले मराठा सेवा संघाचे रमेश जाधव जिल्हा उपाध्यक्ष मनीषा कोळी शहर कार्याध्यक्ष माधुरी चव्हाण अंजली पवार विशाल साळुंके प्रशांत चौरे मिलिंद मस्के शिवाजी थोरात ओंकार कदम शिरीष जगदाळे तात्या इंगोले आदी उपस्थित होते.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**–: संपर्क :–**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ■ | ५ | | | ६ | ७ | ■ |
| ८ | | ■ | ९ | | | | ■ | ■ | १० | | |
| ११ | | ■ | | ■ | ■ | | ■ | १२ | | | ■ |
| ■ | | ■ | १३ | १४ | १५ | ■ | १६ | | | | ■ |
| ■ | ■ | १७ | ■ | १८ | | ■ | १९ | | ■ | ■ | २० |
| २१ | २२ | | ■ | | ■ | २३ | | | ■ | २४ | ■ |
| २५ | | | २६ | | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ |
| २९ | | ■ | | ■ | ३० | | ■ | ३१ | ■ | ३२ | |
| ■ | ३३ | ३४ | | ३५ | ■ | ■ | ३६ | | ३७ | | ■ |
| ३८ | ■ | | ■ | ३९ | ४० | ४१ | | ■ | ४२ | | |
| ४३ | ४४ | | ४५ | ■ | ४६ | | | ४७ | ■ | | ■ |
| ■ | ४८ | | | ■ | ४९ | | ■ | ५० | | | ■ |

**उभे शब्द :** १) नभ, गगन २) पाहुणे ३) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा ४) लहान बाळाला ही टोचतात ५) भारतात सर्वाधिक साक्षरता असलेले राज्य ६) एअरफोर्स (मराठीत) ७) त्वरेने, पटकन १२) न्यूझिलंडचा एक फलंदाज १४) सेनापती १५) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना १६) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत १७) खलनायक (इंग्रजीत) २१) देवाला घातलेले साकडे २२) नाहक त्रास करून घेणे २३) २६/११ च्या हल्ल्यातील दहशतवादी २४) महाराष्ट्राचे काँग्रेस आघाडी सरकारचे एक माजी मुख्यमंत्री २६) कृषी विद्यापीठ असलेले कोकणातील ठिकाण ३१) पाच दुणे ३४) लाकूड कापण्याचे साधन ३५) फळ (हिंदीत) ३६) समुद्राच्या पाण्यात असणारा एक प्राणीजीव ३७) एक म्हण- गाव करील ते ** काय करील ३८) चव ओळखणारी जिव्हा ४०) यशाचे गुपित, सूत्र ४१) परिवर्तन ४४) फळातील गोड द्रव ४५) चार आणि तीन मिळून होणारी संख्या ४७) सज्जन, प्रामाणिक

**आडवे शब्द :** १) भारतातील टी-२० क्रिकेट स्पर्धेचे नाव
५) दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे आडनाव
८) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच ९) सत्वयुक्त, कस असलेले
१०) तरूण ११) एक जुने हिंदी गीत- ** है सुहाना, वातावरण (हिंदीत)
१२) पाण्यात विहरणारा एक पांढऱ्या रंगाचा पक्षी १३) एखाद्या गोष्टीचे लागलेली वाईट सवय १६) महायुध्दाच्या काळातील जर्मनीचा हुकूमशहा
१८) अश्व जोडलेले क्षत्रियाचे वाहन १९) किंमती वस्तू २०) चहा (इंग्रजीत)
२१) आश्चर्य २३) रंग (इंग्रजीत) २५) वतनाचा मालक
२७) दुधावरील मलई
२८) आयपीएल टी-२० क्रिकेट सामन्यातील एक युवा भारतीय फलंदाज-** शॉ
२९) वस उलट लिहा ३०) देव, ईश्वर (हिंदीत) ३२) सीतापती
३३) त्रास (हिंदीत) ३६) राजाला दिली जाणारी उपाधी
३९) घाई, गडबड
४२) आश्वासन, दिलेला शब्द ४३) विश्वास
४६) मुस्लिम धर्माची शिक्षण देणारी शाळा ४८) नेहमी ४९) उद्या (हिंदीत)
५०) तिखट न टाकलेले डाळीचे कालवण

## सुडोकु – 247

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | 9 | | 6 | | | 3 | 8 |
| | | 4 | 5 | | 8 | 1 | | |
| 6 | | 5 | | | | 4 | | 9 |
| | 5 | | 3 | 4 | | | 2 | |
| | | | | | 1 | | | |
| 4 | 7 | | | | 6 | 8 | 9 | 1 |
| | | | 4 | 2 | | 9 | 1 | 3 |
| | 4 | 2 | 9 | 1 | | 6 | | |
| | 9 | 7 | | | | 2 | | 4 |


# महात्मा फुले ज्युनिअर कॉलेजचा शतप्रतिशत निकाल

टेंभुर्णी केंद्रात प्रथम



देशमुख ज्ञानेश्वरी

टेंभुर्णी केंद्रात द्वितीय



गवळी प्रथमेश

टेंभुर्णी केंद्रात तृतीय



दळवी श्रुती

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त)** :- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून टेंभुर्णी येथील महात्मा फुले ज्युनिअर कॉलेजने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हा उत्तम नमुना मानला जात आहे.

महात्मा फुले ज्युनिअर कॉलेजच्या विज्ञान शाखेतील सर्व विद्यार्थी यशस्वी ठरले असून टेंभुर्णी केंद्र व परिसरातील महाविद्यालयांमध्ये विज्ञान विभागात शंभर टक्के निकालाची कामगिरी करणारे हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे. त्यामुळे संपूर्ण टेंभुर्णी परिसरातून संस्थेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यंदाच्या परीक्षेत ज्ञानेश्वरी देशमुख हिने ८५.६७ टक्के गुण मिळवत टेंभुर्णी केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला, तर प्रथमेश गवळी याने ८१.५० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तसेच श्रुती दळवी हिने ८१ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांकावर नाव कोरले. या तिन्ही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतून एकूण १०९ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल ४३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश मिळवले. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशामुळे पालक, शिक्षक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या यशाबद्दल माढा तालुक्याचे आमदार मा. अभिजित आबा पाटील, जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह शिंदे, जिल्हा परिषद सोलापूर महिला व बालकल्याण सभापती अ‍ॅड. अमृताताई वाघे, ज्ञानदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. नारायण भानवसे सर, विद्यालयाचे प्राचार्य विजय यादव सर, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शोएब बागवान सर तसेच संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महात्मा फुले ज्युनिअर कॉलेजने ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, सक्षम मार्गदर्शन आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करून दिल्यामुळे दरवर्षी उल्लेखनीय यश मिळत असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले.

> 'प्रयत्न, जिद्द आणि योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावरच ग्रामीण भागात अशा प्रकारचे घवघवीत यश संपादन करता येते. महात्मा फुले ज्युनिअर कॉलेजने टेंभुर्णी व परिसरात गुणवत्तेचा नवा मापदंड निर्माण केला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.'
>
> **– मा. नारायण भानवसे सर**
> (संस्थापक अध्यक्ष, ज्ञानदीप शिक्षण संस्था)

# वडिलांच्या अंत्यदर्शनाआधी दिली परीक्षा दुःखावर मात करत सोलापूरच्या धनश्रीने मराठीत मिळवले 65 गुण





**सोलापूर (कटूसत्य वृत्त)** :- दहावीच्या परीक्षेचा काळ, घरातील तणाव आणि त्यातच वडिलांच्या निधनाचा जबर धक्का– अशा अत्यंत कठीण परिस्थितीतही जिद्द न हरवता परीक्षा देणाऱ्या सोलापूरच्या धनश्री पवार हिची संघर्षगाथा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. वडिलांच्या अंत्यदर्शनाआधी परीक्षा केंद्रावर जाऊन मराठीचा पेपर लिहिणाऱ्या धनश्रीला आज जाहीर झालेल्या निकालात मराठी विषयात ६५ गुण मिळाले असून ती उत्तीर्ण झाली आहे. तिच्या या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सोलापूर येथील शरदचंद्र पवार प्रशालेमध्ये इयत्ता दहावीमध्ये शिकणाऱ्या धनश्री पवार हिच्या आयुष्यात २० फेब्रुवारी २०२६ हा दिवस मोठे दुःख घेऊन आला. तिचे वडील भिकाजी पवार यांचे अचानक निधन झाले. घरात अंत्यविधीची तयारी सुरू होती, नातेवाईक जमले होते आणि संपूर्ण कुटुंब दुःखात बुडालेले असताना दुसरीकडे धनश्रीसमोर दहावीच्या मराठी विषयाच्या पेपरचे आव्हान उभे होते.

अशा प्रसंगी अनेकजण मानसिकदृष्ट्या खचून गेले असते; मात्र धनश्रीच्या आयुष्यात शिक्षकांनी आधाराचा हात दिला. प्रशालेचे मुख्याध्यापक तानाजी माने यांनी परिस्थितीची गंभीरता लक्षात घेत धनश्री व तिच्या नातेवाईकांची समजूत काढली. त्यांनी अंत्यविधी सुमारे दोन तास पुढे ढकलण्याची विनंती केली आणि स्वतः धनश्रीला परीक्षा केंद्रावर घेऊन गेले.

वडिलांच्या निधनाचे दुःख मनात असतानाही धनश्रीने धैर्य एकवटत परीक्षा हॉलमध्ये प्रवेश केला. अत्यंत तणावपूर्ण मानसिक अवस्थेत तिने तब्बल दीड तास मराठीचा पेपर लिहिला. त्यानंतर पेपर अर्ध्यातूनच सोडून ती घरी परतली आणि वडिलांच्या अंत्यविधीत सहभागी झाली.

दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर धनश्रीने मराठी विषयात ६५ गुण मिळवत उत्तीर्णता मिळवली. तिच्या संघर्षमय प्रवासाने शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक भावूक झाले असून सोशल मीडियावरही तिच्या जिद्दीची चर्चा सुरू आहे.

धनश्रीच्या या यशानंतर शरदचंद्र पवार प्रशालेचे मुख्याध्यापक तानाजी माने, शिक्षक राजाराम शितोळे, नितीन मिस्कीन, श्रीराम बरगंडे, आनंद कोळी, श्वेता बाळशंकर, सुलक्षणा भरगंडे, अर्चना शिंदे, स्वाती नागटिळक, मंजुळा संगा आणि वैशाली सोनटक्के यांनी तिच्या घरी जाऊन सत्कार केला. पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी तिला शुभेच्छाही देण्यात आल्या.

दरम्यान, दहावीनंतर व्होकेशनल अभ्यासक्रमांतर्गत एमएलटी कोर्स करून स्वतःच्या पायावर उभे राहायचे आणि वडिलांचे स्वप्न पूर्ण करायचे, अशी भावना धनश्रीने यावेळी व्यक्त केली.

तिच्या या निर्धाराने उपस्थितांचे डोळे पाणावले.

यावेळी तिची आई सुप्रिया पवार, भाऊ विजय पवार तसेच नुकतीच बारावी उत्तीर्ण झालेली मोठी बहीण वैष्णवी पवार उपस्थित होते. धनश्रीच्या जिद्दीला आणि संघर्षाला समाजातून सलाम केला जात आहे.

# जनसेवा संघटनेच्या जिल्हा सरचिटणीसपदी दिपक पिंजारे यांची निवड



**अकलूज (कटूसत्य वृत्त)**:- महाराष्ट्र जनसेवा संघटनेच्या सोलापूर जिल्हा सरचिटणीसपदी पंढरपूर येथील सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करणारे दिपक पिंजारे यांची निवड करण्यात आली आहे.

धवलनगर येथील प्रतापगडावर महाराष्ट्र जनसेवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते–पाटील यांच्या शुभहस्ते दिपक पिंजारे यांना महाराष्ट्र जनसेवा संघटनेच्या सोलापूर जिल्हा सरचिटणीसपदी निवड झालेले नियुक्तीपत्र देवून फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

दिपक पिंजारे यांनी अनेक वर्ष जनसेवा संघटनेच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्यात अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत.त्यांनी विद्यार्थी चळवळीत सक्रिय सहभाग घेतला होता.

जनसेवेचा एक निष्ठावंत कार्यकर्ता आणि एक विश्वासू सहकारी म्हणून दिपक पिंजारे यांची ओळख असून त्यांचा या कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली आहे.

त्यांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रात केलेले कार्य इतरांना प्रेरणादायी आहे.त्यांच्या या निवडीबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील राजकीय,सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# राज्यातल्या 700 हून अधिक शाळांची मान्यता सरकारकडून रद्द होणार का?

**मुंबई (कटूसत्य वृत्त)**:- राज्यातील 700 हून अधिक शाळा आणि तुकड्या शासनाकडून अपात्र ठरवण्यात येत आहेत. अशा शाळांची मान्यताही रद्द करण्याची तयारी सरकारकडून सुरू झाली आहे.

कायम विनाअनुदानित तत्त्वावर सुरू असलेल्या या शाळांकडून अनुदानासाठीच्या कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली नसल्याचा दावा सरकारच्या शिक्षण विभागाने केला आहे.

पण मुळात अनुदान नकोच होतं तर ही पूर्तता करण्याची गरज काय असा सवाल विचारत सरकारला या शाळा स्वयंअर्थसहाय्यित करून भविष्यातले अनुदानाचे दरवाजेच बंद करायचे असल्याचा आरोप संस्थांकडून करण्यात येत आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे यात राज्यातल्या नावाजलेल्या अनेक शाळांचा समावेश आहे. त्यामुळे सरकारने शिक्षणावरच्या खर्चाची जबाबदारी कमी करत असून त्यासाठीच हा घाट घातला जात असल्याचा आरोप शिक्षणतज्ज्ञ करत आहेत.

दरम्यान, या शाळांनी आपले मूल्यांकन पूर्ण करून घ्यावे यासाठी शासनाकडून पुरेशी संधी उपलब्ध करून देण्यात आली होती पण या शाळांनी त्याची पूर्तता केली नाही असे राज्याच्या शिक्षण संचालकांनी सांगितले.

**शासन निर्णय काय?**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागातर्फे 1 एप्रिल आणि 2 एप्रिल या दोन दिवसांमध्ये दोन शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आले.

कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या तथापि मूल्यांकनाच्या आणि अनुदानाच्या निकषांमध्ये वारंवार अपात्र झालेल्या खाजगी प्राथमिक आणि माध्यमिक शाळा व तुकड्यांबाबत अशा शीर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात आलेल्या या शासन निर्णयात कायम विनाअनुदानित किंवा कायम हा शब्द वगळलेल्या विनाअनुदानित शाळांबाबत मूल्यांकनाचे सुधारित निकष शासनाने पूर्वी जाहीर केलेले निकष नोंदवण्यात आले.

ज्या शाळा शासन निर्णयातील सर्व तरतुदींची पूर्तता करतात आणि त्याबाबत राज्य शासनाची खात्री पटते, अशा शाळांनाच अनुदान देणे अनुज्ञेय राहील असं म्हणण्यात आलं आहे. मात्र वारंवार मूल्यांकन करुनही जी शाळा अपात्र ठरेल अशा शाळांना सलग तीन वर्ष मुल्यांकनात अपात्र ठरल्यास शाळेची मान्यता किंवा परवानगी रद्द करण्याची तरतूद आहे.

संधी देऊनही काही शाळा कागदपत्रांची पूर्तता करू शकल्या नाहीत असं शासनाने म्हटले आहे.

पण, 30 एप्रिल पर्यंत या शाळांनी स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून मान्यतेसाठी अर्ज केला तर त्यांच्या मान्यतेचा विचार करण्यात येईल असं शासन निर्णयात म्हटलं आहे.

ज्या शाळा ही पूर्तता करणार नाहीत त्यांची मान्यता रद्द करून त्या विद्यार्थ्यांना इतर शाळांमध्ये वर्ग करण्याची प्रक्रिया करण्यात येईल असं शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आलं आहे.

**आक्षेप काय?**

यात माध्यमिकच्या 324 शाळा आणि 412 तुकड्या तर प्राथमिकच्या 433 शाळा आणि 33 तुकड्यांचा समावेश आहे. यासाठी शासनाने शाळांना 30 तारखेपर्यंत शाळा मान्यतेचा आदेश, अद्ययावत आधार रिपोर्ट आणि आरटीई मान्यता ही कागदपत्रं सादर करायला सांगितली आहेत.

पण या माध्यमातून विनाअनुदानित तत्त्वावर चालणाऱ्या या शाळांचा यामुळे भविष्यातही अनुदानासाठी अर्ज करण्याचा मार्गच बंद केला जात असल्याचा आरोप संस्थाचालकांकडून केला जात आहे.

कागदपत्रांची जी पूर्तता करण्याची मागणी होती ती मुळात अनुदान हवं असेल तर करायची होती. शाळा विनाअनुदानित असल्याने अनुदानासाठी अर्ज केला नाही या शाळांची मान्यता या मुद्द्याचा आधार घेत का रद्द केली असा सवाल संस्थाचालक विचारत आहेत.

याविषयी बोलताना पुण्यातील अक्षरनंदन शाळेच्या मुख्याध्यापिका रश्मी पंडित म्हणाल्या, "आमच्याकडे कोणतीही कागदपत्रं मागितली गेली नव्हती. ज्यांना अनुदान हवं आहे त्यांनी कागदपत्रं पाठवली. आधी कायम विनाअनुदानित असं होतं त्यातला कायम हा शब्द देखील काढला. आता तुम्ही विनाअनुदानितच्या ऐवजी स्वयंअर्थसहाय्यित अशी मान्यता घ्या हे अचानक आलं आहे. आम्हांला विनाअनुदानित तत्त्वावर शाळा चालवायची आहे. आम्हांला आमचं स्वातंत्र्य अबाधित ठेवायचं आहे. पण अशाने मराठी शाळा कमी होतील."

नाशिकच्या आनंद निकेतन शाळेच्या संचालिका विनोदीनी कलागी यांनी बीबीसी मराठीशी बोलताना सांगितलं, "सरकारला शिक्षणावर पैसाच खर्च करायचा नाही असं दिसतंय. मुळात हा शासन निर्णय आम्हांला पाठवला नाही. तो इकडून तिकडून कळाला. त्यात त्यांनी जे लिहिलंय की आम्ही अनेकदा तपासणी केली असं काही झालेलं नाहीये. आम्हीच नाही तर इतरही अनेक शाळांनी हेच म्हटलं आहे."

"आम्ही मुळात शाळा सुरू करताना ठरवलं होतं की सरकारी पैसा घ्यायचा नाही. आम्हांला प्राथमिक शाळेसाठी विनाअनुदानित म्हणून परवानगी मिळाली. मात्र माध्यमिक शाळेच्या परवानगी साठी झगडा करावा लागला. तेही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर मान्यता द्यावी असं आमचं म्हणणं होतं. इंग्रजी शाळांना मान्यता मिळते मग आम्हांला का नाही असं आम्ही विचारत होतो. मग आम्हांला आठवी ते दहावीसाठी स्वयंअर्थसह्हायित म्हणून मान्यता दिली. पण म्हणून बाकीच्यांना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळा चालवायची असेल असं नाही. शासनाने मराठी शाळांना प्रोत्साहन द्यावं. ते त्यांचं कर्तव्यच आहे."

मुळात शासन जे तीन वेळा संधी दिली गेल्याचा दावा करत आहे तोच फोल असल्याचं एका शाळेच्या सचिवांनी स्पष्ट केलं.

प्रयोगशील शिक्षणासाठी नावाजलेल्या या मराठी शाळेचे सचिव नाव न सांगण्याच्या अटीवर म्हणाले, "कुठल्याही प्रकारची तपासणी झाली नाही ज्याच्या आधारे ते शाळेला अपात्र घोषित करत आहेत. मुळात आमची शाळा विनाअनुदानित आहेच. संस्थेने तसा निर्णय घेतला होता. मात्र शासनाकडून आम्हांला कोणतही पत्र आलं नाही. आम्हांला अनुदान नको असेल तर अर्ज करण्याचाही प्रश्न नाही. मग एका जीआरच्या आधारे आम्हांला अचानक अपात्र कसं ठरवलं जातंय? आणि मुळात आता अर्ज करणं म्हणजे भविष्यात अनुदान मिळवण्याची आवश्यकता असेल तर त्याचे दरवाजे बंद करणं. एकीकडे मराठी शाळा जगवायच्या असं म्हणायचं आणि दुसरीकडे अशी शाळा बंद करून टाकताय!"

संस्थाचालकांचे प्रश्न मांडण्यासाठी या मुद्द्यावर संस्थाचालकांच्या संघटनेकडून देखील शिक्षणमंत्र्यांची भेटीची वेळ मागण्यात आली आहे. मात्र अद्याप वेळ निश्चित झाली नसल्याचं महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या उपाध्यक्ष जागृती धर्माधिकारींनी सांगितलं.

त्या म्हणाल्या, "सध्या दोन प्रकारच्या संस्था आहेत. एक ज्यांना स्वयंअर्थसहाय्यित म्हणून शाळा चालवायला हरकत नाही. मात्र मग अशा शाळांना एखाद्या नफा कमावणाऱ्या कंपनी सारखं काम करु दिलं पाहीजे. शाळा आहे म्हणून चॅरिटी कडे नोंदणी नको असं आम्हांला वाटतं. दुसऱ्या प्रकारच्या संस्था आहेत ज्यांचं म्हणणं आहे की आम्हांला सध्या विनाअनुदानित राहू द्या.

"स्वयंअर्थसहाय्यित नको कारण मग भविष्यात वेळ पडली तर अनुदान मागता येणार नाही. मुळात हा सरकारचा शिक्षणावरच्या खर्चापासून पळ काढण्याचा प्रयत्न आहे. काहीही कागदपत्र न मागता अचानक एका दिवशी शासनाचे अधिकारी उठतात आणि शाळा स्वयंअर्थसहाय्यित ठरवतात किंवा मान्यता रद्द करणार म्हणतात. हे योग्य नाही," असं धर्माधिकारींनी म्हटले.

**शिक्षण आणि शासनाचं धोरण**

मुळात महाराष्ट्र सरकारने 2026 च्या अर्थसंकल्पात शिक्षणावर केलेली तरतूद ही इतर राज्यांच्या तुलनेत कमी असल्याचं आकडेवारी सांगते.

पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च या संस्थेच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र सरकारने यंदा एकूण अर्थसंकल्पाच्या 14.4% तरतूद शिक्षणासाठी केली आहे.

इतर राज्यांमध्ये ती साधारण 14.5 ते 15 % पर्यंत असल्याचं दिसतं. 2025–2026 मध्ये शासनाने एकूण अर्थसंकल्पाच्या 13.9 % तरतूद शिक्षण विभागासाठी केली होती.

# दहावीच्या परीक्षेत जयहिंद विद्यालयाचे देदीप्यमान यश













**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त)**:- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात जयहिंद विद्यालय, कसबे तडवळे (ता. जि.धाराशिव) या विद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. यंदा विद्यालयाचा एकूण निकाल ९१.२२% लागला आहे.

या परीक्षेत विद्यालयातील पवार श्रद्धा संतोष हिने ९७.८०% गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा बहुमान पटकावला. पहिल्या तिन्ही क्रमांकांवर मुलींनीच बाजी मारली असून,पवार श्रद्धा संतोषः ९७.८० % (प्रथम), करंजकर रोहिणी शरदः ९५.२७ % (द्वितीय) गवळी सिद्धी संतोषः ९३.६० % (तृतीय) तसेच कीर्ती संग्राम धोंडगे (९२%), आनंद प्रमोद पाटील (९१.८०%) आणि समाधान धनाजी बोराडे (९०.८०%) या विद्यार्थ्यांनीही ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.विद्यालयातून यावर्षी एस. एस. सी.परीक्षेसाठी एकूण ११५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी ११४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये एकूण १०४ विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले आहेत.विशेष प्राविण्यामध्ये ३३ विद्यार्थी,प्रथम श्रेणीत ३५ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत २७ विद्यार्थी आणि पास श्रेणीत ०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षण प्रेमी नागरिक यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे कौतुक केले.

# विनोद रणदिवे यांचा बाबाराजे देशमुख यांच्या हस्ते सन्मान



**नातेपुते (कटूसत्य वृत्त)**:- नातेपुते शहरातील आंबेडकरी चळवळीचे युवा नेते विनोद रणदिवे यांची नुकतीच सोलापूर जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या अशासकीय सदस्य पदी निवड झाली असून त्यांच्या या निवडीबद्दल सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा भाजप नेते बाबाराजे देशमुख यांच्या शुभहस्ते विनोद रणदिवे यांचा फेटा, शाल, हार, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.


यावेळी डॉ.एम.पी. मोरे, धैर्यशील देशमुख, अमरशील देशमुख, भैय्यासाहेब देशमुख, धनाजीराव देशमुख, एस.एन.डी. स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख, अ‍ॅड. रणवीर देशमुख, करण देशमुख, उद्योजक अतुल बावकर,अ‍ॅड. शिवाजीराव पिसाळ,अर्जुन जठार, महेश शेटे, नारायण बोराटे,जयदिप पवार, रोहित शेटे, शक्ती पलंगे, इमरान नदाफ, बादल सोरटे आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेने व भारतीय जनता पार्टीचे प्रदेश चिटणीस माजी आमदार राम सातपुते यांच्या शिफारशीने सोलापूर जिल्हाधिकारी एस. कार्तिकीयन यांनीअनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक (अ‍ॅट्रॉसिटी) कायद्याअंतर्गत आणि केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीसाठी नातेपुते येथील विनोद रणदिवे यांची सोलापूर जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या अशासकीय सदस्य पदी निवड करून निवडीचे पत्र देण्यात आले आहे. त्यांच्या या झालेल्या निवडीबद्दल त्यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

# हणमंत पडवळ काव्यप्रेमी प्रेरणा पुरस्काराने सन्मानीत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- काव्यप्रेमी शिक्षक मंच आयोजित काव्यप्रेमी साहित्य, संस्था, प्रेरणा व शि.क.बा.पुरस्कार वितरण सोहळा नुकताच लोकमान्य टिळक सभागृह, हिराचंद नेमचंद वाचनालय किल्ला बागेसमोर सोलापूर येथे पार पडला. मा.प्रा. प्रकाश तानुबाई अण्णा महानवर (कुलगुरू पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सोलापूर ) यांचे शुभहस्ते आणि डॉ.इ.जा. तांबोळी (जेष्ठ साहित्यीक तथा प्राचार्य सोशल महाविद्यालय सोलापूर , यांचे अध्यक्षतेखाली व डॉ. सुहास पुजारी ( जेष्ठ समीक्षक व साहित्यीक )आणि मा. पद्माकर कुलकर्णी,(राज्य प्रतिनिधी मसाप पुणे) यांच्या उपस्थित पार पडला . विविध साहित्य कलाकृती, संस्था तसेच काव्यप्रेमी शिक्षक मंच साठी विशेष कार्य करणाऱ्या काव्यप्रेमी शिक्षक साहित्यीक यांना प्रेरणा पुरस्कार देण्यात आले. त्यामध्ये धाराशिव येथील कवी, साहित्यीक वात्रटिकाकार हणमंत पडवळ यांना त्यांच्या साहित्य सेवा आणि मंचासाठी केलेल्या कार्याची दखल घेवून त्यांना काव्यप्रेमी प्रेरणा पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. त्यांना या मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

# अकलूज पोलिसांची मोठी कारवाई; ठिबक सिंचन संच चोरणारी टोळी जेरबंद, ६ गुन्हे उघड



**अकलूज (कटूसत्य वृत्त)**:- अकलूज व माळशिरस तालुक्यातील शेती साहित्याची चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अकलूज पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली आहे.या कारवाईत पोलिसांनी ६ विविध चोरीचे गुन्हे उघडकीस आणले असून एकूण २ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.


**नेमकी घटना काय ?**

दिनांक ६ मे २०२६ रोजी सकाळी फियार्दी महादेव मारुती एकतपुरे (रा.चौंडेश्वरवाडी) यांच्या शेतातून ठिबक सिंचनाचे पाईप चोरून नेत असताना एका व्यक्तीला रंगेहात पकडण्यात आले होते.याप्रकरणी अकलूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असता चोरीचे मोठे रॅकेट समोर आले. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव विकास नाना उर्फ रावसाहेब चोरमले वय २३ (रा.६१ फाटा माळशिरस) असे आहे. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता त्याने चौंडेश्वरवाडी परिसरातून ५५ हजार रुपये किमतीचे पाईप चोरल्याची कबुली दिली.इतकेच नाही तर मागील काही महिन्यांत त्याने अकलूज, माळशिरस आणि वेळापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेल्या अनेक चोऱ्यांची माहिती दिली.

अकलूज पोलिसांनी आरोपीकडून १००% मुद्देमाल हस्तगत केला असून यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे. एकूण रोख मूल्यः २,४४,००० रुपये (विविध ६ गुन्ह्यातील मुद्देमाल), चोरीसाठी वापरलेली तीन चाकी रिक्षा वाहन (MH 45 AN 6109) आणि एक 'एच.एफ. डिलक्स' मोटारसायकल इतरः औषध फवारणीसाठी वापरले जाणारे एसटीपी मशीन जप्त करण्यात आली आहे.

ही यशस्वी कारवाई सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी,अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज पोलीस ठाण्याचे प्रभारी निरज उबाळे व त्यांच्या टीमने केली आहे. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम, पोलीस हवालदार विनोद साठे, अभिजीत कुंभार, अमोल मिरगणे, सुनिल माने आणि पंडीत गवळे यांनी या तपासात महत्त्वाची भूमिका बजावली.सध्या या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम हे करत आहेत. या कारवाईमुळे परिसरातून शेती साहित्याची चोरी करणाऱ्या गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

# कुमठे प्रशालेचा निकाल 81.74 टक्के



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- कुमठे प्रशालेने दहावी बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट निकालाची परंपरा यंदाही कायम राखली असून प्रशालेचा दहावी बोडार्चा निकाल 81.74 टक्के लागला असून प्रशाले मधून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण विद्यार्थी 9, प्रथम श्रेणी उत्तीर्ण विद्यार्थी 36, द्वितीय श्रेणी उत्तीर्ण विद्यार्थी 36 व सर्वसाधारण उत्तीर्ण 22 आहेत.

प्रशाले मधून प्रथम– अनुराग फुलारी 91. 00 टक्के, द्वितीय – अंकिता घोडके 90.60 व तृतीय – ऋतुजा जाधव 89.7 टक्के गुण प्राप्त करून यश प्राप्त केले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीपराव माने,संस्थेचे मुख्य विश्वस्त व नगरसेवक जयकुमार माने व विश्वस्त स्वातीताई माने यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले करण्यात आले या प्रसंगी प्रशाले चे प्राचार्य जयसिंग गायकवाड,पर्यवेक्षक वसंत गुंगे, लिटल स्टार च्या मुख्याध्यापिका सौ. शुभांगी पवार व मलकारी कोरे उपस्थित होते.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना विजयसिंह क्षीरसागर, संजय घोडके, परमेश्वर कोळी व नितीनकुमार लावंड या शिक्षकांनी मार्गदर्शन केले होते.